मुंबई
■ सोमवार, २७ जुलै ते ०२ ऑगस्ट २०२६
■ वर्ष : १४
■ अंक : १९
■ पृष्ठ : ४
■ किंमत : २ रुपए
■ PRGI Regd. No: MAHMAR/2013/50698

मराठी साप्ताहिक

# सातारा प्रतिनिधी

संपादक : एकनाथ दगडू गाडे    कार्यकारी संपादक : निखिल गाडे

www.satarapratinidhinews.com च्या सर्व सोशल मीडिया लिंक, ताज्या घडामोडी आणि अपडेट्स पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा

## थोडक्यात

### सायन-कोळीवाड्यात मतदार याद्यांच्या विशेष पुनरीक्षण मोहिमेला गती द्या; अतिरिक्त आयुक्त प्राजक्ता वर्मा-लवंगारे यांचे निर्देश

**मुंबई प्रतिनिधी**

मतदार याद्यांचे विशेष सखोल पुनरीक्षण (स्पेशल इंटेन्सिव्ह रिव्हिजन - एस.आय.आर.) कार्यक्रमाची बृहन्मुंबई क्षेत्रात अधिक प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी प्रशासकीय यंत्रणेने आपले प्रयत्न आणखी तीव्र करावेत, असे आवाहन अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) प्राजक्ता वर्मा-लवंगारे यांनी केले आहे.
या मोहिमेच्या प्रत्यक्ष कामकाजाचा आढावा घेण्यासाठी वर्मा-लवंगारे यांनी 179 सायन-कोळीवाडा विधानसभा मतदारसंघातील मतदार नोंदणी अधिकारी कार्यालयास नुकतीच अचानक भेट दिली. या पाहणीदरम्यान त्यांनी मतदार केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) तसेच सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी (एईआरओ) यांच्याशी सविस्तर संवाद साधून सध्या सुरु असलेल्या कामाची सखोल माहिती घेतली. यावेळी त्यांनी गणना अर्जांचे घरपोहोच वितरण,



नागरिकांकडून त्यांचे संकलन, त्यानंतर झालेली माहितीची संगणकीय नोंद (डिजिटायझेशन) आणि एकूण प्रगतीचा सद्यस्थितीचा आढावा घेतला तसेच उपस्थितांना कामकाजात गती आणण्यासाठी आवश्यक त्या महत्त्वाच्या सूचनाही दिल्या.
या महत्त्वपूर्ण बैठकीप्रसंगी एफ उत्तर विभागाचे सहायक आयुक्त अरुण क्षीरसागर, मतदार नोंदणी अधिकारी तिडके, निवडणूक समन्वय अधिकारी डॉ. श्रीकृष्ण वाव्हळ यांच्यासह संबंधित विभागाचे सहायक मतदार नोंदणी अधिकारी आणि इतर अधिकारी-कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रशासनाच्या या विशेष मोहिमेमुळे आगामी काळात मुंबईतील मतदार याद्या अधिक अचूक आणि सदोष विरहित होण्यास मोठी मदत होणार असून, नागरिकांनीही या प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवावा, अशी अपेक्षा यानिमित्ताने व्यक्त करण्यात येत आहे.

### मेळघाटातील आश्रमशाळेत १०० हून अधिक विद्यार्थी आजारी; अन्नविषबाधेचा संशय

**आमरावती,प्रतिनिधी**

मेळघाटातील धारणी तालुक्यातील टीटंबा येथील शासकीय पोस्ट बेसिक आदिवासी आश्रमशाळेत दुपारच्या जेवणानंतर 100 हून अधिक विद्यार्थ्यांना उलट्या, मळमळ आणि पोटदुखीचा त्रास झाल्याने अन्नविषबाधेचा संशय व्यक्त करण्यात आला. सर्व विद्यार्थ्यांना तातडीने धारणी उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांची प्रकृती धोक्याबाहेर असल्याची माहिती प्रशासनाने दिली.
घटनेची माहिती मिळताच उपविभागीय अधिकारी सिद्धार्थ शुक्ला, तहसीलदार प्रदीप शेवाळे आणि पोलीस अधिकाऱ्यांनी रुग्णालयात भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला. वैद्यकीय पथकाकडून विद्यार्थ्यांवर उपचार सुरु असून, अन्नाचे नमुने तपासणीसाठी पाठविण्यात आले आहेत. तपास अहवालानंतर अन्नविषबाधेचे नेमके कारण स्पष्ट होणार असल्याचे प्रशासनाने सांगितले.
दरम्यान, आश्रमशाळेला अन्नपुरवठा करणाऱ्या 'सेंट्रल किचन'च्या अन्नाच्या गुणवत्तेबाबत प्रश्न उपस्थित होत असून, संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी पालक व स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.



# शिक्षण खात्याची जबाबदारी आता प्रल्हाद जोशींकडे; धर्मेंद्र प्रधानांच्या राजीनाम्यानंतर केंद्र सरकारचा मोठा निर्णय

**नवी दिल्ली वृत्तसंस्था**

केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी शनिवारी आपल्या पदाचा राजीनामा दिल्यानंतर केंद्र सरकारने शिक्षण मंत्रालयाच्या अतिरिक्त कार्यभाराची जबाबदारी केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी यांच्याकडे सोपवली आहे. नवीन शिक्षणमंत्र्यांची नियुक्ती होईपर्यंत प्रल्हाद जोशी हे त्यांच्या विद्यमान मंत्रालयांसोबतच शिक्षण मंत्रालयाचा कारभारही सांभाळणार आहेत.
राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा स्वीकारल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सल्ल्यानुसार हा निर्णय घेण्यात आला. धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यामुळे केंद्र सरकारमध्ये महत्त्वाची राजकीय घडामोड घडली असून, शिक्षण मंत्रालयाची जबाबदारी आता काही काळासाठी प्रल्हाद जोशी यांच्याकडे आली आहे. नवीन शिक्षणमंत्र्यांच्या नावाची अधिकृत घोषणा होईपर्यंत



जोशी हे या मंत्रालयाचे कामकाज पाहतील.

**प्रल्हाद जोशींकडे शिक्षण मंत्रालयाचा अतिरिक्त कार्यभार**

धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर राष्ट्रपती भवनाकडून जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार, प्रल्हाद जोशी यांना त्यांच्या विद्यमान मंत्रालयांसोबतच शिक्षण मंत्रालयाचा अतिरिक्त कार्यभार सोपवण्यात आला आहे. त्यामुळे आता ग्राहक व्यवहार, अन्न व सार्वजनिक वितरण आणि नवीन व नवीकरणीय ऊर्जा या मंत्रालयांच्या जबाबदाऱ्यांसोबतच त्यांच्यावर शिक्षण मंत्रालयाचीही अतिरिक्त जबाबदारी असणार आहे.
नवीन केंद्रीय शिक्षणमंत्र्यांची नियुक्ती झाल्यानंतर प्रल्हाद जोशी यांच्याकडील शिक्षण मंत्रालयाचा अतिरिक्त कार्यभार संपुष्टात येणार आहे. तोपर्यंत शिक्षण मंत्रालयाशी संबंधित धोरणात्मक आणि प्रशासकीय निर्णयांची जबाबदारी त्यांच्याकडेच राहणार आहे.

**कोण आहेत प्रल्हाद जोशी?**

प्रल्हाद जोशी हे कर्नाटकातील धारवाड लोकसभा मतदारसंघाचे खासदार असून, केंद्र सरकारमधील महत्त्वाचे नेते म्हणून त्यांची ओळख आहे. सध्या ते ग्राहक व्यवहार, अन्न व सार्वजनिक वितरण तसेच नवीन व नवीकरणीय ऊर्जा या मंत्रालयांची जबाबदारी सांभाळत आहेत. याशिवाय ते इंटरनॅशनल सोलर अलायन्सचे अध्यक्षही आहेत.
आता शिक्षण मंत्रालयाचा अतिरिक्त कार्यभारही त्यांच्याकडे सोपवण्यात आल्याने आगामी काळात शिक्षण क्षेत्राशी संबंधित महत्त्वाच्या विषयांवर त्यांची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे.

**धर्मेंद्र प्रधानांचा राजीनामा; आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर मोठी घडामोड**

दरम्यान, गेल्या काही दिवसांपासून धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी जोर धरत होती. नीट परीक्षेतील कथित पेपरफुटी आणि परीक्षा व्यवस्थेतील अनियमिततेच्या मुद्द्यावरून राजधानी दिल्लीतील जंतर-मंतरवर आंदोलन सुरू होते. या आंदोलनादरम्यान केंद्रीय शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी सातत्याने करण्यात आली होती.
याच पार्श्वभूमीवर धर्मेंद्र प्रधान यांनी शनिवारी शिक्षणमंत्री पदाचा राजीनामा दिला. विद्यार्थ्यांचे भविष्य सुरक्षित ठेवणे आणि दिल्लीतील आंदोलनाचा गैरफायदा देशविरोधी शक्तींना घेता येऊ नये, या कारणांचा उल्लेख करत त्यांनी हा निर्णय घेतल्याचे सांगितले.
प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर केंद्र सरकारच्या पातळीवर तातडीने हालचाली सुरू झाल्या आणि शिक्षण मंत्रालयाचा अतिरिक्त कार्यभार प्रल्हाद जोशी यांच्याकडे सोपवण्यात आला.

**CJP सोबतच्या चर्चेपूर्वी राजीनामा**

धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची घोषणा केंद्र सरकार आणि 'कॉकरोच जनता पार्टी' (CJP) यांच्यातील चर्चेच्या तिसऱ्या फेरीच्या काही तास आधी झाल्याचे सांगण्यात येत आहे. आंदोलनकर्त्यांकडून प्रधान यांचा राजीनामा ही प्रमुख आणि 'नॉन-नेगोशिएबल' मागणी असल्याचे स्पष्ट करण्यात आले होते.
त्यामुळे प्रधान यांच्या राजीनाम्याने या आंदोलनाला निर्णायक वळण मिळाले आहे. आता शिक्षण मंत्रालयाची जबाबदारी तात्पुरती प्रल्हाद जोशी यांच्याकडे सोपवण्यात आली असून, केंद्र सरकारकडून पुढील काळात नवीन शिक्षणमंत्र्याच्या नावाची घोषणा केली जाण्याची शक्यता आहे.
दरम्यान, शिक्षण मंत्रालयाच्या नव्या नेतृत्वाकडे विद्यार्थ्यांच्या परीक्षा व्यवस्थेतील सुधारणांपासून पेपरफुटी रोखण्यासाठीच्या उपाययोजनांपर्यंत अनेक महत्त्वाच्या प्रश्नांकडे लक्ष द्यावे लागणार आहे. त्यामुळे नवीन शिक्षणमंत्री कोण असणार, याकडे राजकीय वर्तुळासह विद्यार्थी आणि पालकांचेही लक्ष लागले आहे.

## ४ वर्षांपासून फरार असलेली महिला आरोपी अखेर अटकेत; खून प्रकरणातील गुन्हे शाखा-३ ची धडक कारवाई

**नागपूर प्रतिनिधी**

खून प्रकरणाचा निकाल लागण्यापूर्वीच तब्बल चार वर्षांपासून फरार असलेल्या मुख्य महिला आरोपीला नागपूर शहर गुन्हे शाखा युनिट-३ च्या पथकाने बेड्या ठोकल्या आहेत. गुप्त माहितीच्या आधारे वाडी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील लावा परिसरात सापळा रचून ही धडक कारवाई करण्यात आली. अश्विनी सूरज देशभ्रतार (३२, रा. नागपूर) असे अटकेतील कुख्यात महिला आरोपीचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या सविस्तर माहितीनुसार, वर्ष २०२२ मध्ये नागपूरच्या कळमना पोलिस ठाण्यात खून, खुनाचा प्रयत्न, लैंगिक अत्याचार, पोक्सो कायदा तसेच इतर गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला होता. विशेष म्हणजे, या संपूर्ण प्रकरणाची मूळ तक्रार खुद्द अश्विनी देशभ्रतार हिनेच दिली होती. या खटल्याच्या सुनावणीनंतर न्यायालयाने पुराव्यांच्या आधारे चार आरोपींची निर्दोष मुक्तता केली. मात्र, या गंभीर गुन्ह्यात मृताच्या वडिलांसह अश्विनी देशभ्रतार हिलाही न्यायालयाने दोषी ठरवले. न्यायालयाने मृताच्या वडिलांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली, परंतु न्यायालयीन निकाल जाहीर होण्यापूर्वीच अश्विनी पोलिसांच्या डोळ्यात धूळ फेकून पसार झाली होती. फरार झाल्यानंतर अश्विनी नागपूरसह राज्याबाहेर वेगवेगळ्या ठिकाणी लपून राहत असल्याची माहिती पोलिसांच्या हाती लागली होती. दरम्यान, गुन्हे शाखा युनिट-३ च्या पथकाला अश्विनी ही लावा परिसरामध्ये येणार असल्याची अत्यंत गोपनिय माहिती मिळाली. या माहितीची खात्री पटताच पोलिसांनी तत्काळ पावले उचलत लावा परिसरात सापळा रचला आणि आरोपी अश्विनी देशभ्रतार हिस शिताफीने ताब्यात घेतले. वैद्यकीय तपासणी पूर्ण झाल्यानंतर पुढील कायदेशीर व दंडात्मक कारवाईसाठी तिला कळमना पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले असून, या प्रकरणाचा पुढील कसून तपास सुरू आहे. ही यशस्वी कारवाई गुन्हे शाखा युनिट-३ चे पोलीस निरीक्षक अतुल मोहनकर, पोलीस उपनिशक्षक अमित देशमुख, तसेच पोलीस अंमलदार अमोल जासुद, विनोद गायकवाड, अनुप तायवाडे, अजय पाटील, दिनेश डवरे, विवेक भोयर, रोहित काळे, मनीषा रामटेके, मंगेश मेश्राम, अनिल बोटरे आणि दामिनी पथकातील पोलीस हवालदार प्रिती थोटे, दिव्या काळे यांच्या पथकाने पार पाडली.



# अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेची पहिली यादी जाहीर! तुमचं नाव आहे का?

**सातारा प्रतिनिधी**

राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६' अंतर्गत पात्र शेतकऱ्यांच्या याद्या जाहीर करण्यास सुरुवात झाली असून, पहिल्या टप्प्यात १६ लाख ९६ हजार शेतकऱ्यांची यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. उर्वरित पात्र लाभार्थ्यांच्या याद्याही लवकरच जाहीर करण्यात येणार असल्याची माहिती सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी दिली. या योजनेअंतर्गत राज्यातील सुमारे ५६ लाख पात्र शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचा लाभ मिळणार आहे. यासाठी पात्र शेतकऱ्यांनी ॲग्रीस्टॅकवर नोंदणी करून आधार प्रमाणीकरण प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी, असे आवाहनही सहकार मंत्र्यांनी केले. योजनेतील पात्र लाभार्थ्यांची यादी संबंधित बँकांनी महाआयटीने विकसित केलेल्या पोर्टलवर अपलोड केली असून त्याची पडताळणीही पूर्ण झाली आहे. आधार प्रमाणीकरणासाठी पात्र शेतकऱ्यांच्या नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर एसएमएसद्वारे सूचना पाठविण्यात येणार आहेत. तसेच ग्रामपंचायत कार्यालये, विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था आणि संबंधित बँक शाखांमध्येही लाभार्थ्यांच्या याद्या उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. योजनेतील प्रत्येक पात्र लाभार्थ्याला विशिष्ट ओळख क्रमांक देण्यात येणार आहे. आधार क्रमांक किंवा या विशिष्ट ओळख क्रमांकाच्या आधारे आधार प्रमाणीकरण करणे बंधनकारक राहणार आहे. ही प्रक्रिया सुलभ करण्यासाठी राज्यभरातील सुमारे ३२ हजार 'आपले सरकार सेवा केंद्रां'वर ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. राज्य शासनाने पात्र शेतकऱ्यांनी कोणताही विलंब न करता नोंदणी आणि आधार प्रमाणीकरण पूर्ण करून कर्जमुक्ती योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.




## नीट पेपरफुटीतील प्रमुख आरोपी डॉ. शिरुरेचा जामीन अर्ज फेटाळला; 'तुमच्यामुळे देशाची झाली बदनामी,' कोर्टाचे ताशेरे

**नवी दिल्ली वृत्तसंस्था**

तुम्ही तुमच्या लोभासाठी आणि अवैध संपत्ती गोळा करण्यासाठी संपूर्ण परीक्षा प्रक्रियाच उधळून लावली. दिवसरात्र मेहनत करणाऱ्या प्रामाणिक विद्यार्थ्यांचा विश्वासघात केला. एवढेच नाही, तर तुमच्या निंदनीय कृत्यांमुळे केवळ कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले नाही, तर संपूर्ण देशाची मानही खाली गेली आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर देशाची बदनामी झाली, अशा अत्यंत तीव्र शब्दांत ताशेरे ओढत दिल्लीतील विशेष न्यायालयाने नीट (NEET) परीक्षा पेपरफुटी प्रकरणातील प्रमुख आरोपी डॉ. मनोज शिरुरे याचा जामीन अर्ज फेटाळून लावला आहे. या बहुचर्चित प्रकरणातील सर्व १३ आरोपींच्या न्यायालयीन कोठडीत आगामी ६ ऑगस्टपर्यंत वाढ करण्यात आली आहे. विशेष न्यायाधीश अजय गुप्ता यांच्यासमोर डॉ. मनोज शिरुरे याच्या जामीन अर्जावर नुकतीच सुनावणी पार पडली. यावेळी न्यायालयाने पेपरफुटी प्रकरणातील आरोपींवर तीव्र संताप व्यक्त केला. दिवसरात्र एक करून, प्रामाणिकपणे अभ्यास करून परीक्षा देणाऱ्या लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य या रॅकेटमुळे अंधकारमय झाले आहे, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले. आरोपींनी आपल्या वैयक्तिक स्वार्थापोटी संपूर्ण यंत्रणा वेठीस धरली असून हे सर्व आरोपी पेपर लीक करणाऱ्या आंतरराज्यीय गँगचे सक्रिय सदस्य असल्याचा ठपका न्यायालयाने ठेवला आहे. या सुनावणीदरम्यान सीबीआयने आरोपीच्या जामीन अर्जाला कडाडून विरोध केला. सीबीआयने न्यायालयाला माहिती दिली की, मुख्य आरोपी डॉ. मनोज शिरुरे याने एका विद्यार्थ्याकडून तब्बल पाच लाख रुपये उकळले आणि गेल्या एप्रिल महिन्यातच फुटलेला रसायनशास्त्राचा (केमिस्ट्री) पेपर थेट स्वतःच्या रुग्णालयात बोलावून त्या विद्यार्थ्याला उपलब्ध करून दिला होता. विशेष म्हणजे, एवढ्यावरच न थांबता डॉ. शिरुरे याने या रॅकेटमधील आणखी दोन डॉक्टरांची नावे या गुन्हेगारी गँगचा एकरुप हिस्सा असलेल्या डॉ. पी. व्ही. कुलकर्णी याला सुचविली होती. या अन्य डॉक्टरांनीही या पेपरफुटीचा गैरफायदा उठवत विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळल्याचे तपासात उघड झाले आहे. दरम्यान, या संपूर्ण प्रकरणाची पाळेमुळे किती खोलवर रुजलेली आहेत आणि याचा देशभरातील लाखो तरुण-तरुणींच्या भविष्यावर कसा विपरीत परिणाम झाला आहे, याचा सखोल तपास केंद्रीय यंत्रणेकडून सुरू असून आगामी काळात या रॅकेटमधील आणखी काही मोठे मासे गळाला लागण्याची शक्यता वर्तवली जात आहे.




## बांद्र्यात फरार आरोपी अखेर पोलिसांच्या जाळ्यात! निर्मल नगर पोलिसांची मोठी कारवाई; खुनी हल्ल्याचा आणि मारहाणीचा आरोपी गजाआड

**स्वप्नील गाडे,गुन्हे वार्ताहर**

निर्मल नगर पोलीस ठाण्यात गंभीर गुन्हा दाखल झाल्यापासून फरार असलेला सराईत गुन्हेगार अखेर पोलिसांच्या जाळ्यात सापडला आहे. मुशर्रफ मुबीन खान उर्फ मामा (वय ४९, राहणार मकराणी गल्ली, बेहरामनगर, बांद्रा पूर्व, मुंबई) असे या अटक केलेल्या आरोपीचे नाव असून, तो पोलिसांना सतत चकवा देत होता.

**नेमकं प्रकरण काय आहे**

निर्मल नगर पोलीस ठाण्यात (गुन्हा रजिस्टर क्रमांक ५०५/२०२६) भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०८(४), ३५१(३) आणि ३५२ नुसार एक गुन्हा दाखल झाला होता. हा गुन्हा नोंदवल्यापासूनच आरोपी मुशर्रफ खान उर्फ मामा हा आपले घर



सोडून पळून गेला होता. पोलिसांच्या हाती लागू नये म्हणून तो सतत आपली राहण्याची ठिकाणे बदलत होता आणि लपून छपून राहत होता. त्यामुळे त्याला शोधून काढणे पोलिसांसाठी एक मोठे आव्हान बनले होते.

**पोलिसांनी कसा रचला सापळा?**

या गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजय कुलकर्णी यांनी आरोपीचा शोध घेण्यासाठी विशेष सूचना दिल्या होत्या. त्यानुसार, पोलीस उपनिरीक्षक संतोष कोळगे आणि त्यांच्या 'गुन्हे प्रकटीकरण पथकाने' (डिटेक्शन ब्रांच) अत्यंत गोपनीय पद्धतीने माहिती काढण्यास सुरुवात केली.यादरम्यान, काल, २२ जुलै रोजी पोलिसांच्या पथकाला एक पक्की खबर मिळाली की, फरार आरोपी मुशर्रफ खान हा बांद्रा पश्चिम येथील बांद्रा तलाव परिसरात येणार आहे. या खात्रीशीर माहितीच्या आधारे, पोलीस उपनिरीक्षक संतोष कोळगे आणि त्यांच्या पथकाने तात्काळ त्या परिसरात सापळा रचला. आरोपी तलाव परिसरात येताच, पोलिसांनी अतिशय शिताफीने त्याला ताब्यात घेतले. त्यानंतर पुढील कारवाईसाठी त्याला तात्काळ निर्मल नगर पोलीस ठाण्यात आणण्यात आले.

**पुढील कारवाई काय?**

पोलिसांनी कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून आरोपी मुशर्रफ खान उर्फ मामा याला रीतसर अटक केली आहे. त्याला बांद्रा येथील माननीय प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी ३२ वे न्यायालय यांच्यासमोर हजर करण्यात येणार असून, पोलीस त्याच्या पोलीस कोठडीची (रिमांड) मागणी करणार आहेत.
या प्रकरणाचा पुढील तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजय कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# झुरळांनी हलवली दिल्लीची गादी!

दिल्लीच्या सत्तेच्या अभेद्य किल्ल्याला हादरा देण्यासाठी मोठमोठ्या राजकीय पक्षांची गरज असते, असा समज देशाच्या राजकारणात रूढ झाला होता. सत्ताधाऱ्यांना आव्हान द्यायचे असेल तर संसदेत शेकडो खासदार, कोट्यवधींचा निधी, संघटनात्मक ताकद आणि निवडणुकीतील प्रचंड यंत्रणा लागते, असे मानले जात होते. पण या समजुतीला तडा देणारी एक विलक्षण घटना देशाच्या राजकीय पटलावर घडली आहे. सोशल मीडियावरील एका उपरोधिक ‘मीम’मधून जन्माला आलेल्या ‘कॉकरोच जनता पार्टी’ने थेट दिल्लीच्या सत्ताकेंद्राला हादरा दिला



आणि अखेर केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांना पदाचा राजीनामा द्यावा लागला, असा दावा या आंदोलनाच्या समर्थकांकडून केला जात आहे.

म्हणूनच आज एक प्रश्न दिल्लीच्या राजकीय वर्तुळात घुमतो आहे. झुरळांनी दिल्लीची गादी हलवली का? या प्रश्नाचे उत्तर केवळ ‘हो’ किंवा ‘नाही’ एवढे सरळ नाही. मात्र एक गोष्ट निर्विवाद आहे. देशातील तरुणांच्या संतापाला जर दिशा मिळाली, तर तो सत्तेच्या सर्वात मजबूत भिंतींनाही हादरे देऊ शकतो.

नीट-यूजी परीक्षेतील कथित पेपरफुटी, परीक्षा व्यवस्थेवरील प्रश्नचिन्हे आणि विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित गंभीर आरोपांमुळे देशभरातील तरुणांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली. वर्षानुवर्षे स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या लाखो विद्यार्थ्यांसाठी एक परीक्षा म्हणजे केवळ प्रश्नपत्रिका नसते; ती त्यांच्या आयुष्याची दिशा असते. त्यांच्या पालकांची वर्षानुवर्षांची बचत, विद्यार्थ्यांच्या असंख्य रात्रींची मेहनत आणि भविष्यासाठी पाहिलेली स्वप्ने या एका परीक्षेशी जोडलेली असतात. अशा वेळी परीक्षेच्या पारदर्शकतेवर संशय निर्माण झाला, तर तो केवळ प्रशासनाचा प्रश्न राहत नाही; तो संपूर्ण पिढीच्या विश्वासाचा प्रश्न बनतो.

याच असंतोषाला आवाज मिळाला. सुरुवातीला हा आवाज डिजिटल माध्यमांपुरता मर्यादित होता. पण हळूहळू तो रस्त्यावर उतरला. अभिजीत दीपके यांनी उभारलेल्या ‘कॉकरोच जनता पार्टी’ने या संतापाला उपरोधिक आणि आक्रमक राजकीय भाषेत मांडले. ‘आळशी आणि बेरोजगारांचा आवाज’ अशी खिल्ली उडवणारी घोषणा असली, तरी त्यामागे एक गंभीर वास्तव दडलेले होते. आजचा तरुण राजकीय पक्षांच्या पारंपरिक चौकटीबाहेर स्वतःचा आवाज शोधत आहे. हीच या आंदोलनाची खरी ताकद ठरली.

सत्ताधाऱ्यांना वाटते की आंदोलन म्हणजे काही शेकडो लोकांचा जमाव, दोन दिवसांची घोषणाबाजी आणि त्यानंतर शांतता. परंतु डिजिटल युगातील आंदोलनाचे स्वरूप बदलले आहे. आज एक व्हिडीओ, एक पोस्ट, एक मीम किंवा एक हॅशटॅग काही तासांत लाखो लोकांपर्यंत पोहोचू शकतो. कालपर्यंत ज्याला ‘ट्रोलिंग’ किंवा ‘सोशल मीडिया अॅक्टिव्हिझम’ म्हणून हिणवले जात होते, तेच माध्यम आज सत्तेला प्रश्न विचारण्याचे प्रभावी हत्यार ठरू शकते. ‘कॉकरोच जनता पार्टी’च्या कथित यशाने याच नव्या राजकीय वास्तवावर शिक्कामोर्तब केले आहे.

या आंदोलनाला निर्णायक वळण मिळाले ते सोनम वांगचुक यांच्या सहभागामुळे. विद्यार्थ्यांच्या आंदोलनात एका अनुभवी सामाजिक कार्यकर्त्याचा प्रवेश झाल्याने त्याची व्याप्ती वाढली. जंतरमंतरवरील आंदोलनाकडे राष्ट्रीय पातळीवर लक्ष वेधले गेले. वांगचुक यांच्या दीर्घ उपोषणाने सरकारवर नैतिक दबाव निर्माण झाला. आंदोलनाच्या व्यासपीठावरून ते बाजूला झाले असले, तरी त्याआधी त्यांनी तरुणांच्या असंतोषाला राष्ट्रीय चर्चेच्या केंद्रस्थानी आणले होते.

**लेख - उमेश गायगवळे**
**9769020286**

त्यांच्या उपोषणाच्या समाप्तीभोवती निर्माण झालेल्या चर्चांनीही आंदोलनाला नवे राजकीय परिमाण दिले. सरकारशी काही ‘डील’ झाली का, असे प्रश्न विचारले गेले. त्यावर स्पष्टीकरणे आली. मात्र या सगळ्या वादापलीकडे एक सत्य कायम राहिले. विद्यार्थ्यांचा मूळ प्रश्न सुटलेला नव्हता. परीक्षा व्यवस्थेवरील विश्वास परत मिळालेला नव्हता. आणि म्हणूनच आंदोलन थांबले नाही.

अखेर धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची बातमी आली आणि आंदोलनकर्त्यांनी हा आपला विजय असल्याचे घोषित केले. हा राजीनामा नेमका कोणत्या कारणामुळे झाला, सरकारचा अंतर्गत निर्णय काय होता आणि त्यामागे कोणती राजकीय गणिते होती, यावर पुढील काळात अनेक दावे-प्रतिदावे होतील. परंतु राजकीय परिणामाच्या दृष्टीने या घटनेचे महत्त्व नाकारता येणार नाही.

कारण २०१४ नंतरच्या राजकीय काळात केंद्रातील एखाद्या मोठ्या मंत्र्याला जनआंदोलनाच्या थेट दबावामुळे राजीनामा द्यावा लागणे, ही बाब निश्चितच मोठ्या चर्चेचा विषय ठरते. यापूर्वीही मोदी सरकारच्या काळात मंत्रिमंडळात फेरबदल झाले, काही मंत्र्यांना पदावरून दूर करण्यात आले, काहींनी राजीनामे दिले. मात्र प्रत्येक राजीनामा हा आंदोलनाच्या दबावाचा थेट परिणाम होता, असे सरसकट म्हणता येणार नाही. त्यामुळे धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची राजकीय व्याख्या करताना वस्तुस्थिती आणि राजकीय भाष्य यांची सीमारेषा स्पष्ट ठेवणे आवश्यक आहे.

तरीही या घटनेने एक महत्त्वाचा प्रश्न उपस्थित केला आहे. मोठमोठ्या राजकीय पक्षांना जे जमले नाही, ते विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला कसे जमले? उत्तर स्पष्ट आहे. कारण या आंदोलनात राजकीय पक्ष केंद्रस्थानी नव्हते. प्रश्न ज्यांचा होता, तेच रस्त्यावर उतरले होते.

विद्यार्थी स्वतःच्या भवितव्यासाठी लढत होते. पालक आपल्या मुलांच्या भविष्याच्या चिंतेने अस्वस्थ होते. सामाजिक कार्यकर्ते या लढ्याला व्यापक व्यासपीठ देत होते. राजकीय पक्षांनी या आंदोलनाला पाठिंबा देण्याचा प्रयत्न केला; पण आंदोलनाची सूत्रे त्यांच्या हातात गेली नाहीत. यातून विरोधी पक्षांनीही धडा घेण्याची गरज आहे.

सत्ताधाऱ्यांवर टीका करण्यासाठी प्रत्येक आंदोलनाचे राजकीय अपहरण करण्याची सवय विरोधी पक्षांनी सोडली पाहिजे. तरुणांच्या प्रश्नांवर त्यांच्यासोबत उभे राहणे आणि त्यांचे आंदोलन आपल्या पक्षाच्या झेंड्याखाली आणणे यात जमीन-अस्मानाचा फरक आहे. आजचा तरुण कोणत्याही पक्षाचा ‘व्होट बँक’ होण्यास तयार नाही. तो प्रश्न विचारतो, उत्तर मागतो आणि उत्तर मिळाले नाही तर स्वतःच रस्त्यावर उतरतो.

याच कारणामुळे २०२१ च्या शेतकरी आंदोलनानंतरचे हे आणखी एक महत्त्वाचे जनआंदोलन म्हणून या घटनेकडे पाहिले जात आहे. दोन्ही आंदोलनांमध्ये एक समान धागा दिसतो. प्रभावित घटकांनी स्वतःच्या प्रश्नांसाठी लढा उभारला आणि राजकीय पक्षांना त्याच्या मागे उभे राहावे लागले. ही बाब भारतीय लोकशाहीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहे. पण आता सरकारसमोरचा खरा प्रश्न राजीनाम्याने संपत नाही.

पेपरफुटीची समस्या संपली का? परीक्षा व्यवस्थेवरील विद्यार्थ्यांचा विश्वास परत आला का? दोषींवर कठोर कारवाई झाली का? भविष्यात अशा घटना पुन्हा घडणार नाहीत, याची खात्री निर्माण झाली का? या प्रश्नांची उत्तरे अद्याप बाकी आहेत.

एखाद्या मंत्र्याचा राजीनामा हा राजकीय समाधान असू शकतो; पण तो शैक्षणिक व्यवस्थेवरील उपचार नाही. विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळणाऱ्या व्यवस्थेतील त्रुटी दूर करण्यासाठी कठोर आणि पारदर्शक सुधारणा कराव्या लागतील. पेपरफुटीला जबाबदार असलेल्या यंत्रणेवर कारवाई करावी लागेल. शिक्षणाचं कार्पोरेट बाजारीकरण थांबवलं पाहिजे. परीक्षा घेणाऱ्या संस्थांची उत्तरदायित्वाची चौकट मजबूत करावी लागेल. अन्यथा आज धर्मेंद्र प्रधान गेले, उद्या दुसरा मंत्री येईल; पण विद्यार्थ्यांच्या मनातील भीती कायम राहील.

आणखी एक राजकीय पैलू दुर्लक्षित करता येणार नाही. दिल्लीतील सत्तेला आता तरुणांच्या बदलत्या मानसिकतेची जाणीव झाली असेल. २०२९ च्या लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर देशातील तरुण मतदार निर्णायक ठरू शकतो. बेरोजगारी, स्पर्धा परीक्षा, शिक्षणाचा वाढता खर्च आणि सरकारी नोकऱ्यांमधील संधी या प्रश्नांवर तरुणांची नाराजी वाढली तर तिचे राजकीय परिणाम होऊ शकतात. त्यामुळे सरकारने तरुणांच्या प्रश्नांकडे केवळ कायदा-सुव्यवस्थेच्या चष्म्यातून पाहणे धोकादायक ठरेल.

दिल्लीच्या सत्तेला सर्वात मोठा धक्का ‘झुरळां’नी दिला असेल, तर त्याचा अर्थ सत्ताधाऱ्यांनी समजून घेतला पाहिजे. झुरळ लहान असते, पण ते जिवंत राहण्याची आणि संकटातून मार्ग काढण्याची क्षमता दाखवते. या आंदोलनानेही तेच दाखवले आहे. सामान्य नागरिकाला कमी लेखू नका. विद्यार्थ्यांना गृहीत धरू नका. बेरोजगार तरुणांच्या संतापाची खिल्ली उडवू नका.

कारण ज्यांना तुम्ही नगण्य समजता, तेच कधी कधी सत्तेच्या सिंहासनाला सर्वात मोठा धक्का देतात.

आज ‘कॉकरोच जनता पार्टी’चा विजय हा केवळ एका पक्षाचा किंवा एका नेत्याचा विजय म्हणून पाहणे चुकीचे ठरेल. हा विजय त्या प्रत्येक विद्यार्थ्याचा आहे, ज्याने परीक्षा व्यवस्थेत पारदर्शकता मागितली. हा विजय त्या पालकांचा आहे, ज्यांनी आपल्या मुलांच्या भविष्याची चिंता व्यक्त केली. हा विजय त्या तरुणांचा आहे, ज्यांना राजकीय पक्षांच्या आश्वासनांपेक्षा आपल्या प्रश्नांची उत्तरे हवी आहेत. मात्र हा विजय अंतिम नाही. खरी लढाई आता सुरू झाली आहे.

राजीनामा झाला म्हणून प्रश्न संपत नाही. प्रश्नपत्रिका फुटण्याची ‘किड’ मुळापासून उखडली पाहिजे. परीक्षा व्यवस्थेवर विश्वास पुनर्स्थापित झाला पाहिजे. दोषींना शिक्षा झाली पाहिजे. आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळण्याची कोणाचीही हिंमत होणार नाही, अशी व्यवस्था उभी केली पाहिजे.

अन्यथा उद्या पुन्हा एखादे मीम जन्म घेईल. पुन्हा एखादा ‘झुरळ’ उठेल. पुन्हा एखादा अभिजीत दीपके आवाज देईल. पुन्हा एखादा सोनम वांगचुक रस्त्यावर बसेल. आणि पुन्हा दिल्लीच्या सत्तेला जनतेच्या आवाजासमोर झुकावे लागेल.

आज धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याने एक राजकीय संदेश दिला आहे. सत्ता कितीही बलाढ्य असली, तरी जनतेचा संताप संघटित झाला की तिच्या गादीला हादरा बसतो.

म्हणूनच या घटनेकडे केवळ एका मंत्र्याच्या राजीनाम्याच्या चष्म्यातून पाहू नका. ही एका नव्या राजकीय युगाची चाहूल असू शकते. ज्या काळात पक्षांपेक्षा प्रश्न मोठे असतील, नेत्यांपेक्षा नागरिक मोठा असेल आणि निवडणुकांपेक्षा जनआंदोलनाची ताकद अधिक प्रभावी ठरेल.

दिल्लीने हा धडा घेतला नाही, तर पुढचा धक्का आणखी मोठा असेल. कारण यावेळी झुरळांनी फक्त गादी हलवली आहे.

उद्या कदाचित संपूर्ण व्यवस्था हलवण्याची वेळ येऊ शकते!

## वांद्रे येथील 'रंगशारदा'वर ईडीचा दणका; ५१२ कोटींची मालमत्ता जप्त

मुंबई प्रतिनिधी

वांद्रे येथील प्रसिद्ध रंगशारदा हॉटेल आणि सांस्कृतिक संकुलावर सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) मोठी कारवाई करत सुमारे ५१२ कोटी रुपयांची संपत्ती जप्त केली आहे. म्हाडाने सांस्कृतिक उपक्रमांसाठी सवलतीच्या दरात दिलेल्या भूखंडाचा व्यावसायिक वापर करून फसवणूक केल्याप्रकरणी ही कारवाई करण्यात आली असून, या प्रकरणातील मुख्य आरोपी प्रभुदास वीरचंद लोटिया यांच्यावर मनी लॉन्डरिंगचा ठपका ठेवण्यात आला आहे.

मराठी नाटक, साहित्य आणि सांस्कृतिक उपक्रमांना चालना देण्याच्या हेतूने म्हाडाने वांद्रे येथील हा बहुमूल्य भूखंड ‘रंगशारदा प्रतिष्ठान ट्रस्ट’ला सवलतीच्या दरात वितरित केला होता. मात्र, प्रत्यक्षात या जमिनीचा वापर अटी व शर्तींचे उल्लंघन करून व्यावसायिक कारणांसाठी केल्याचा गंभीर आरोप ईडीच्या तपासात समोर आला आहे. ‘रंगशारदा हॉटेल्स प्रायव्हेट लिमिटेड’ने नियमानुसार नाट्यगृह आणि कलाकारांच्या निवासाची जागा ट्रस्टकडे हस्तांतरित करणे बंधनकारक असताना तसे केले नाही. त्याऐवजी, कोणतीही कायदेशीर मंजुरी न घेता याच जागेवर हॉटेल, लॉज, रेस्टॉरंट, बार, बँक्वेट हॉल आणि इतर व्यावसायिक आस्थापने थाटण्यात आली.

ईडीच्या तपासात उघड झाले की, प्रभुदास वीरचंद लोटिया यांनी ट्रस्टच्या जमिनीवर उभारलेल्या या व्यावसायिक जागांची अनधिकृतपणे विक्री केली. या विक्रीतून मिळालेल्या कोट्यवधी रुपयांचा निधी वळवून त्यातून प्रभादेवी परिसरात अन्य मालमत्ता खरेदी करण्यात आली. या संपूर्ण मनी लॉन्ड्रिंग प्रकरणातील गुन्ह्याद्वारे जमा झालेली बेहिशोबी संपत्ती (प्रोसीड्स ऑफ क्राईम) सुमारे ५१२ कोटी रुपये इतकी असल्याचे ईडीने स्पष्ट केले आहे. यापूर्वी याच प्रकारच्या आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी केंद्रीय यंत्रणेने अनिल अंबानी समूहाविरुद्धही मोठी कारवाई करत ४० हून अधिक मालमत्ता जप्त केल्या होत्या. आता रंगशारदा प्रकरणातील या धडक कारवाईमुळे संकुलाशी संबंधित वर्तुळात मोठी खळबळ उडाली असून, पुढील तपासात आणखी मोठे खुलासे होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.




## मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या ई-केवायसीसाठी सरकारकडून ६ महिन्यांची मुदतवाढ; लाखो महिलांना मोठा दिलासा

मुंबई, प्रतिनिधी

राज्याच्या राजकारणात अत्यंत चर्चा आणि गेम चेंजर ठरलेल्या ‘मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण’ योजनेबाबत राज्य सरकारने एक मोठा आणि महत्त्वाचा निर्णय घेतला असून, ई-केवायसीची प्रक्रिया पूर्ण न झालेल्या लाखो महिलांचे टेन्शन आता मिटले आहे. गेल्या काही दिवसांपासून या योजनेच्या अर्जावरून आणि प्रक्रियेवरून लाभार्थी महिलांमध्ये संभ्रम निर्माण झाला होता, मात्र आता राज्याच्या महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी यासंदर्भात महत्त्वाची घोषणा करत महिलांना मोठा दिलासा दिला आहे.

‘लाडकी बहीण’ योजनेचा लाभ घेण्यासाठी अनिवार्य असलेली ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी राज्य शासनाकडून तब्बल सहा महिन्यांची मुदतवाढ देण्याचा तडकाफडकी निर्णय घेण्यात आला आहे. ही सर्व पात्र लाडक्या बहिणींसाठी अत्यंत आनंदाची बातमी ठरणार आहे. यासंदर्भात माध्यमांशी बोलताना मंत्री आदिती तटकरे यांनी स्पष्ट केले की, ज्या महिलांनी ई-केवायसी पूर्ण केली आहे परंतु प्रक्रियेदरम्यान काही तांत्रिक त्रुटी किंवा उणिवा राहून गेल्या आहेत, त्यांना त्या दुरुस्त करण्याची विशेष संधी देखील सरकारकडून उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे कोणतीही महिला या कल्याणकारी योजनेपासून




वंचित राहणार नाही आणि ही योजना अत्यंत यशस्वीरित्या आणि पारदर्शकपणे राबविली जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

दरम्यान, अलीकडच्या काळात या योजनेचा हफ्ता वाढवावा, अशी मागणी काही महिला वर्गाकडून जोर धरू लागली होती. यावर भाष्य करताना आदिती तटकरे यांनी सांगितले की, लाडकी बहीण योजनेचा हप्ता आगामी काळात वाढवायचा किंवा नाही याबाबतचा अंतिम निर्णय राज्याचे मुख्यमंत्री घेतील. दुसरीकडे, दिल्लीतील विद्यार्थ्यांच्या आंदोलनावर बोलताना त्यांनी लोकशाही मूल्यांवर प्रकाश टाकला. देशात लोकशाही असून कुठे काही चुकीचे घडत असल्यास ती बाब प्रशासनाच्या किंवा सरकारच्या निदर्शनास आणून देण्याचा अधिकार प्रत्येक नागरिकाला आहे, असे मत त्यांनी मांडले. तसेच, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शिक्षण क्षेत्रात सुधारणा घडवून आणण्यासाठी योग्य पावले उचलली असून विद्यार्थ्यांच्या विविध मागण्या हे सरकार अत्यंत सकारात्मक पद्धतीने सोडवेल आणि आपली शिक्षण व्यवस्था अधिक सक्षम केली जाईल, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला आहे. या महत्त्वपूर्ण निर्णयामुळे राज्यातील लाखो महिलांचा जीवनप्रवाह सुखकर होण्यास मदत होणार आहे

## शिवाजी पार्कवर तरुणाईचा तुफान जल्लोष; ‘मतं चोरी करता येतात, माणसं आणि मनं नाही’, उद्धव ठाकरेंचा मोदी सरकारवर घणाघात

मुंबई प्रतिनिधी

शिवाजी पार्कच्या ऐतिहासिक शिवतीर्थावर रविवारी तरुणाईचा अभूतपूर्व जल्लोष पाहायला मिळाला. हातात तिरंगा, मनात देशभक्ती आणि सरकारच्या कारभाराविरोधात तीव्र संताप घेऊन मुंबईसह राज्याच्या विविध भागांतून हजारो तरुण-तरुणी शिवाजी पार्कवर दाखल झाले होते. या गर्दीला संबोधित करताना शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केंद्र सरकारवर जोरदार हल्लाबोल करत देशातील राजकीय संघर्षाला नवे वळण मिळाल्याचा दावा केला.

‘अंधभक्तांविरोधात देशभक्त जिंकले आहेत. आता भाजप विरुद्ध भारत अशा संघर्षाची सुरुवात झाली आहे,’ असा थेट एल्गार उद्धव ठाकरे यांनी केला.

‘आज मी देशातल्या तमाम देशभक्तांना अभिवादन करतो. अंधभक्तांविरोधात देशभक्त जिंकले आहेत. या संघर्षाची सुरुवात झाली आहे. हा संघर्ष आता भाजप विरुद्ध भारत असा सुरू झाला आहे. एका झुरळाने हुकूमशहाला नमवले आहे. हा खरा विष्णूचा अवतार आहे,’ असे म्हणत उद्धव ठाकरे यांनी सत्ताधाऱ्यांवर उपरोधिक टीका केली.

यावेळी त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनाही लक्ष्य केले. ‘मोदीजी, आतातरी देशाकडे लक्ष द्या. तुमचे मंत्री काम सोडून पक्ष फोडण्यात व्यस्त आहेत. त्यांना सांगा, आता देशाचे काम करा,’ असे आवाहन त्यांनी केले.

अर्थव्यवस्था, महागाई आणि रुपयाच्या घसरणीवरूनही उद्धव ठाकरे यांनी केंद्र सरकारला धारेवर धरले. ‘अर्थमंत्री निर्मला सीतारामन घसरता रुपया आणि वाढती महागाई यावर बोलत नाहीत; मात्र पेपरफुटीचे फायदे समजावून सांगत आहेत. संरक्षणमंत्री राजनाथ सिंह देशाच्या संरक्षणाची चिंता करण्याऐवजी धर्मेंद्र प्रधान यांच्या संरक्षणासाठी पुढे आले. तर रस्ते वाहतूकमंत्री इथेनॉलवर बोलत आहेत,’ असा टोला त्यांनी लगावला.

धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याचा संदर्भ देत उद्धव ठाकरे यांनी सरकारवर आणखी गंभीर आरोप केले. ‘तुमच्या लाडक्या धर्मेंद्रला मंत्रिमंडळातून काढताना तुम्हाला ज्या यातना झाल्या असतील, त्यापेक्षा कितीतरी पटीने जास्त यातना आपण ज्यांना श्रद्धांजली वाहिली त्या मुलांच्या कुटुंबीयांना झाल्या आहेत. त्या वेदना आम्ही विसरणार नाही,’ असा इशारा त्यांनी दिला.

‘ही ठिणगी आता पडली आहे आणि देशभर वणवा पेटला आहे,’ असे सांगत उद्धव ठाकरे यांनी आंदोलनाची धार कायम ठेवण्याचे आवाहन केले.

**‘निवडणुका गेल्या खड्ड्यात; माणसं आणि मनं चोरता येत नाहीत’**

आगामी निवडणुकांना अद्याप तीन वर्षांचा कालावधी असल्याचा मुद्दा उपस्थित करणाऱ्यांनाही उद्धव ठाकरे यांनी प्रत्युत्तर दिले. ‘काहीजण विचारतात, निवडणुकीला अजून तीन वर्षे आहेत. अहो, निवडणुका गेल्या खड्ड्यात! मोदींनी आता पाहिले आहे की मतं चोरी करता येतात; पण माणसं चोरी करता येत नाहीत. मनं चोरता येत नाहीत. ही मनं आता पेटलेली आहेत,’ असे ते म्हणाले.

ही जागृती आणि असंतोष कायम ठेवणे ही सर्वांची जबाबदारी असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. तरुणांना धमक्या देणाऱ्यांविरोधात आवाज उठवण्याचे आवाहन करताना त्यांनी, ‘अंधभक्त मुलांना धमक्या देत असतील तर त्यांचे व्हिडीओ काढा आणि पोस्ट करा. जिथे सापडतील तिथे त्यांना राष्ट्रभक्ती शिकवा,’ असे आवाहन केले.

**‘तरुणाईने इतिहासात सुवर्णपान लिहिले’**

शिवाजी पार्कवर जमलेल्या तरुणाईचे कौतुक करताना उद्धव ठाकरे यांनी या आंदोलनाची नोंद देशाच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी होईल, असा दावा केला.

‘तरुणांनी देशाच्या इतिहासातले सुवर्णपान लिहिले आहे. तुमच्या शक्तीची आणि एकजुटीची नोंद देशाच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी झाल्याशिवाय राहणार नाही. मात्र आता आलेली ही जागृती जाऊ देऊ नका. सत्ताधाऱ्यांची मस्ती सहन करू नका. देशाची शक्ती काय असते, हे दाखवून दिलेल्या या देशाला पुन्हा कुणालाही कमजोर करू देऊ नका,’ असे आवाहन त्यांनी केले.




**राज ठाकरे काय म्हणाले?**


शिवाजी पार्कवरील या विजयी जल्लोषाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या भूमिकेकडेही राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. या आंदोलनात तरुणाईने दाखवलेली एकजूट, देशभर निर्माण झालेला असंतोष आणि केंद्र सरकारच्या कारभाराविरोधात उभा राहिलेला जनक्षोभ याबाबत राज ठाकरे यांनी आपली भूमिका स्पष्ट केल्यास या संपूर्ण घडामोडींना आणखी राजकीय धार मिळण्याची शक्यता आहे. दरम्यान, उद्धव ठाकरे यांच्या आक्रमक भाषणामुळे शिवाजी पार्कवरील वातावरण चांगलेच तापले. ‘देशभक्त विरुद्ध अंधभक्त’ आणि ‘भाजप विरुद्ध भारत’ या घोषणांमधून त्यांनी केंद्र सरकारविरोधातील संघर्षाची दिशा स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे आगामी काळात या आंदोलनाचे पडसाद महाराष्ट्रासह देशाच्या राजकारणात उमटण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

सातारा प्रतिनिधी

# शहापूरात धबधब्यावर दुर्घटना! कल्याणचे पाच पर्यटक पुराच्या पाण्यात वाहून गेले; एकाचा मृत्यू, एक बेपत्ता

**ठाणे, प्रतिनिधी**

ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यात रविवारी दुपारी झालेल्या मुसळधार पावसाने चोंढे धबधबा परिसरात अचानक पूरस्थिती निर्माण झाली. डोंगरदऱ्यांतून आलेल्या पाण्याच्या प्रचंड लोंढ्यात कल्याण येथील पाच पर्यटक वाहून गेल्याची दुर्दैवी घटना घडली. या दुर्घटनेत आकाश देशमुख (वय २१) यांचा बुडून मृत्यू झाला असून दिनेश मांडलकर हे अद्याप बेपत्ता आहेत. तर नितेश पाटील, अजय मुरकुटे आणि प्रसाद इगंडा यांना स्थानिक ग्रामस्थांनी धाडस दाखवत सुखरूप बाहेर काढले. रविवारी दुपारनंतर डोळखांब परिसरात मुसळधार पाऊस कोसळला. त्यामुळे नदी-नाले दुथडी भरून वाहू लागले. चोंढे धबधब्यावर मोठ्या संख्येने पर्यटक उपस्थित असताना काही मिनिटांतच पाण्याचा प्रवाह धोकादायकरीत्या वाढला. अचानक आलेल्या पुरामुळे परिसरात एकच गोंधळ उडाला आणि कल्याणहून फिरण्यासाठी आलेले पाच पर्यटक पाण्याच्या लोंढ्यात वाहून गेले. घटनेनंतर स्थानिक ग्रामस्थांनी तत्परता दाखवत बचावकार्य सुरू केले. त्यांनी नितेश पाटील, अजय मुरकुटे आणि प्रसाद इगंडा यांना पाण्यातून सुखरूप बाहेर काढले. मात्र आकाश देशमुख यांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. तर दिनेश मांडलकर हे वाढलेल्या प्रवाहात वाहून गेल्याने त्यांचा शोध युद्धपातळीवर सुरू आहे. घटनेची माहिती मिळताच तहसीलदार परमेश्वर कासुळे, साहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन खैरनार, महसूल व पोलीस प्रशासनाचे अधिकारी तसेच स्थानिक बचाव पथके घटनास्थळी दाखल झाली. नदीपात्र आणि धोकादायक भागात बेपत्ता पर्यटकाचा शोध घेण्यासाठी शो ध मो ही म राबविण्यात आली असून, शोध लागेपर्यंत बचावकार्य सुरू ठेवण्यात येणार असल्याची माहिती प्रशासनाने दिली. दरम्यान, मुसळधार पावसाचा फटका डोळखांब बाजारपेठेलाही बसला. अचानक आलेल्या पुराच्या पाण्याने अनेक दुकाने जलमय झाली. दुकानांमध्ये पाणी शिरल्याने व्यापाऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून परिसरात जनजीवन विस्कळीत झाले आहे.



## 'वाद मिटवू' म्हणत बोलावलं अन् थेट संपवलं! छत्रपती संभाजीनगरात 21 वर्षीय तरुणाची निर्घृण हत्या; माजी नगरसेवकाच्या मुलावर संशय

**छत्रपती संभाजीनगर, प्रतिनिधी**

रोजेबाग परिसरात जुन्या वादातून 21 वर्षीय तरुणाची धारदार शस्त्रांनी हत्या झाल्याने शहरात खळबळ उडाली आहे. खान नासिर खान तारेख अहमद (रा. शाह बाजार) याला 'वाद मिटवू' असे सांगून बोलावण्यात आले. मात्र, तेथे दबा धरून बसलेल्या टोळक्याने त्याच्यावर लाठ्या-काठ्यांनी मारहाण करत चाकूने सपासप वार केले. या हल्ल्यात त्याचा जागीच मृत्यू झाला.

प्राथमिक माहितीनुसार, जुन्या वैरातून हा कट रचण्यात आला होता. नासिरला विश्वासात घेऊन घटनास्थळी बोलावण्यात आले आणि त्यानंतर आठ जणांच्या टोळक्याने त्याच्यावर जीवघेणा हल्ला केला. घटनेनंतर परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

या प्रकरणी सिटी चौक पोलिसांनी तातडीने कारवाई करत आठपैकी सात संशयितांना अटक केली असून एक आरोपी फरार आहे. दरम्यान, या हत्येचा मास्टरमाइंड शहरातील एका माजी नगरसेवकाचा मुलगा असल्याचा आरोप मयत नासिरच्या भावाने केला आहे. पोलिसांकडून प्रकरणाचा पुढील तपास सुरू असून आरोपींची कसून चौकशी करण्यात येत आहे.



# आर्थिक व्यवहारातील वादातून मित्रावर गोळीबार; सरपंचासह दोघांना २४ तासांत बेड्या

**कराड : प्रतिनिधी**

उंब्रजजवळील इंदोली–पेरले पुलानजीक पुणे–बंगळूरू राष्ट्रीय महामार्गावर शुक्रवारी मध्यरात्री झालेल्या थरारक गोळीबार प्रकरणाचा उंब्रज पोलिसांनी स्थानिक गुन्हे शाखेच्या मदतीने अवघ्या २४ तासांत छडा लावत मुख्य आरोपी असलेल्या कालगावच्या सरपंचासह त्याच्या साथीदाराला अहिल्यानगर येथून अटक केली. आर्थिक व्यवहारातील वादातून हा जीवघेणा हल्ला झाल्याचे तपासात समोर आले आहे.

या प्रकरणात कालगावचे सरपंच सोमनाथ रमेश चव्हाण आणि त्याचा साथीदार योगेश सुदाम दीक्षित (रा. मसूर, ता. कराड) यांना पोलिसांनी ताब्यात घेतले असून, त्यांना न्यायालयात हजर करण्याची प्रक्रिया सुरू होती. गोळीबारात गंभीर जखमी झालेले संतोष घोलप यांच्यावर कराड येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती तपासी अधिकारी तथा उंब्रज पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक पंकज पवार यांनी दिली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सोमनाथ चव्हाण आणि संतोष घोलप हे एकाच गावातील असून गौण खनिज व्यवसायातील आर्थिक व्यवहारांवरून त्यांच्यात काही दिवसांपासून वाद सुरू होता. हा वाद मिटविण्याच्या बहाण्याने शुक्रवारी मध्यरात्री घोलप यांना इंदोली फाट्याजवळ बोलावण्यात आले. दोघांमध्ये झालेल्या शाब्दिक वादाचे रूपांतर हाणामारीत झाले. त्यानंतर संतापाच्या भरात चव्हाण याने आपल्या फॉर्च्युनरमधील पिस्तुलातून घोलप यांच्यावर दोन गोळ्या झाडल्या. त्यापैकी एक गोळी मांडीला, तर दुसरी पायाला लागल्याने घोलप गंभीर जखमी झाले. गोळीबारानंतर आरोपी घटनास्थळावरून पसार झाले.

घटनेची माहिती मिळताच सहाय्यक पोलीस निरीक्षक पंकज पवार यांच्या नेतृत्वाखालील पथकाने घटनास्थळी धाव घेत पंचनामा करून वैज्ञानिक पुरावे गोळा केले. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन स्थानिक गुन्हे शाखेची विशेष पथकेही तपासासाठी रवाना करण्यात आली. तांत्रिक विश्लेषण, सीसीटीव्ही फुटेज आणि गोपनीय माहितीच्या आधारे आरोपी अहिल्यानगर येथील कायनेटिक चौकाजवळील 'हॉटेल साई सूर्या'मध्ये लपल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार सापळा रचून पोलिसांनी अवघ्या २४ तासांत सोमनाथ चव्हाण आणि योगेश दीक्षित या दोघांना ताब्यात घेतले.

आर्थिक व्यवहारातून निर्माण झालेला वाद थेट जीवघेण्या गोळीबारापर्यंत पोहोचल्याने कराड तालुक्यात खळबळ उडाली होती. या गुन्ह्याचा वेगाने उलगडा करून आरोपींना अटक करण्यात उंब्रज पोलीस व स्थानिक गुन्हे शाखेला यश आले असून, या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.



## MPSC औषध निरीक्षक भरती परीक्षा पेपरफुटीचा आरोप, १०० पैकी ९० प्रश्न व्हॉट्सअॅपवर व्हायरल झाल्याचा दावा

**मुंबई, प्रतिनिधी**

महाराष्ट्र लोकसेवा आयोग (एमपीएससी) मार्फत घेण्यात आलेल्या औषध निरीक्षक (अन्न व औषध प्रशासन) भरती परीक्षेवर पेपरफुटीचा गंभीर संशय व्यक्त करण्यात आला आहे. परीक्षेतील १०० पैकी तब्बल ९० प्रश्न परीक्षा होण्याच्या दोन दिवस आधीच व्हॉट्सअॅपवर व्हायरल झाल्याचा दावा एका परीक्षार्थीने केल्याने खळबळ उडाली आहे.

ही परीक्षा २२ मार्च रोजी पार पडली होती. मात्र, २० मार्चलाच प्रश्नपत्रिकेतील बहुतेक प्रश्न सोशल मीडियावर फिरत असल्याचा आरोप परीक्षार्थी गौरव पाटील यांनी केला आहे. यासंदर्भात त्यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोग आणि अन्न व औषध प्रशासनाकडे ई-मेलद्वारे अधिकृत तक्रार दाखल केली आहे.

तक्रारीची दखल घेत अन्न व औषध प्रशासनाने २४ जुलै रोजी गौरव पाटील यांचा सविस्तर जबाब नोंदवला. तसेच त्यांच्याकडील व्हॉट्सअॅप चॅट आणि इतर पुरावे ताब्यात घेऊन पुढील चौकशीसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे पाठवले आहेत.

दरम्यान, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने पेपरफुटीचे सर्व आरोप प्राथमिक स्तरावर फेटाळले आहेत. परीक्षा पार पडली तेव्हा कोणतीही तक्रार प्राप्त झाली नव्हती. निकाल जाहीर झाल्यानंतर ही तक्रार दाखल करण्यात आली असल्याचे आयोगाने स्पष्ट केले आहे. मात्र, प्राप्त तक्रारीच्या आधारे सखोल चौकशी सुरू असून, आरोपांमध्ये तथ्य आढळल्यास दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, असे आयोगाने म्हटले आहे. याचबरोबर, चौकशीत आरोप निराधार ठरले आणि आयोगाची बदनामी करण्याच्या उद्देशाने हे दावे करण्यात आल्याचे निष्पन्न झाल्यास संबंधितांविरोधात कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने दिला आहे. आता या प्रकरणाच्या चौकशीत नेमके काय निष्पन्न होते, याकडे राज्यभरातील हजारो एमपीएससी परीक्षार्थ्यांचे लक्ष लागले आहे.




## भाड्याने राहणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्याने घरमालकाच्या मुलीला लग्नाचं आमिष; अत्याचारानंतर तरुणीचा मृत्यू, आरोपी फरार

**अकोला, प्रतिनिधी**

लोकांच्या सुरक्षेची जबाबदारी सांभाळणाऱ्या पोलीस दलाची प्रतिमा मलिन करणारी धक्कादायक घटना अकोला जिल्ह्यातील बाळापूर येथे समोर आली आहे. भाड्याने राहत असलेल्या घरातील तरुणीला लग्नाचं आमिष दाखवून एका पोलीस कर्मचाऱ्याने वारंवार लैंगिक अत्याचार केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे.

या मानसिक त्रासाला कंटाळून तरुणीने आत्महत्येचा प्रयत्न केला होता. उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाल्याने परिसरात संतापाची लाट उसळली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, बाळापूर पोलीस ठाण्यात कार्यरत असलेला पोलीस कर्मचारी पवन वडगावे हा पीडित तरुणीच्या घरात भाड्याने राहत होता. त्याने लग्नाचे आश्वासन देत तिच्याशी संबंध ठेवले आणि वारंवार लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप नातेवाईकांनी केला आहे. तसेच, पीडित मुलगी अल्पवयीन असतानापासूनच तिचे शोषण सुरू असल्याचाही गंभीर आरोप करण्यात आला आहे.

या सततच्या त्रासामुळे तरुणीने गळफास घेऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. गंभीर अवस्थेत तिला रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. काही दिवस ती कोमामध्ये होती. मात्र उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला. मृतदेह शवविच्छेदनासाठी अकोला जिल्हा शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आला आहे.

दरम्यान, मुख्य आरोपी पवन वडगावे हा सध्या फरार असून, त्याला पळून जाण्यास काही पोलिसांनी मदत केल्याचा आरोपही पीडितेच्या नातेवाईकांनी केला आहे. या घटनेनंतर संतप्त नागरिकांनी पोलीस उपविभागीय कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन सुरू केले. आरोपीला तातडीने अटक करून कठोर शिक्षा द्यावी, अशी मागणी आंदोलकांनी केली असून, न्याय मिळेपर्यंत आंदोलन मागे घेणार नसल्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

या घटनेमुळे अकोला जिल्ह्यात संतापाचे वातावरण निर्माण झाले असून, आरोपीचा शोध घेण्यासाठी पोलीस पथके रवाना करण्यात आल्याची माहिती मिळत आहे.




## NEET परीक्षेचा मनासारखा निकाल लागला नाही, पोरीने नको नको तो विचार केला, नको ते पाऊल उचललं

**अहिल्यानगर, प्रतिनिधी**

नीट (NEET) फेरपरीक्षेत अपेक्षित गुण न मिळाल्याने नैराश्यात गेलेल्या १९ वर्षीय विद्यार्थिनीने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची हृदयद्रावक घटना अहिल्यानगर जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील जलालपूर येथे घडली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून स्पर्धा परीक्षांमधील वाढत्या मानसिक तणावाचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

अंकिता सुरेश सांगळे (वय १९) असे मृत विद्यार्थिनीचे नाव आहे. तिने २१ जून रोजी झालेल्या नीटच्या फेरपरीक्षेला हजेरी लावली होती. या परीक्षेत तिला १६६ गुण मिळाले, तर पात्रतेसाठी १७७ गुणांची आवश्यकता होती. अपेक्षित यश न मिळाल्याने ती गेल्या काही दिवसांपासून मानसिक तणावाखाली होती, अशी माहिती कुटुंबीयांनी दिली.

शनिवार, २५ जुलै रोजी अंकिताचे वडील आणि भाऊ पंढरपूर येथे दर्शनासाठी गेले होते. घरात आई कामात व्यस्त असताना अंकिताने अभ्यासासाठी दिलेल्या स्वतंत्र खोलीत गळफास घेतला. बराच वेळ ती बाहेर न आल्याने आईने खोलीचा दरवाजा उघडून पाहिले असता ती गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळली. शेजाऱ्यांनी तत्काळ पोलिसांना माहिती दिली. पोलीस निरीक्षक हनुमान गायकवाड यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. त्यानंतर मृतदेह शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठविण्यात आला.

घटनास्थळी पोलिसांना अंकिताने लिहिलेली सुसाईड नोटही मिळाली. या चिठ्ठीत तिने आपल्या मृत्यूसाठी कोणालाही जबाबदार धरू नये, अशी विनंती केली आहे. परीक्षेत अपेक्षित यश मिळाले नाही, डॉक्टर होण्याचे स्वप्न अपूर्ण राहिले आणि त्यामुळे नैराश्य आले, असा उल्लेख तिने या पत्रात केला आहे.

कुटुंबीयांच्या माहितीनुसार, अंकिताने यापूर्वी झालेल्या नीट परीक्षेत चांगले गुण मिळविले होते. मात्र पेपरफुटीच्या पार्श्वभूमीवर फेरपरीक्षा घेण्यात आली. या परीक्षेतील निकाल अपेक्षेपेक्षा कमी लागल्याने ती खचली होती. पात्रतेसाठी आवश्यक गुण न मिळाल्याची सल तिच्या मनात होती. या मानसिक तणावातूनच तिने टोकाचे पाऊल उचलल्याचे अंकिताचे काका अण्णासाहेब सांगळे यांनी सांगितले. या घटनेमुळे स्पर्धा परीक्षांमधील मानसिक तणाव, विद्यार्थ्यांवरील अपेक्षांचे ओझे आणि समुपदेशनाची गरज याविषयी पुन्हा गंभीर चर्चा सुरू झाली आहे.



हे मराठी साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक एकनाथ दगडू गाडे यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाळा नं.4, तळ मजला, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, आरे रोडच्या समोर, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं.2, गोरेगांव (पू), मुंबई-400063 येथे छापून आर-13, गौतम समता सेवा संघ, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई-51 येथून प्रकाशित केले.. संपादक एकनाथ दगडू गाडे (मो. 98213 49985) (RNI : MAHMAR/2013/50698)